प्रेस नोट १४ दिनांक ०६/१०/२०२५

-----------------------

## ट्रॉम्बे पोलीसांनी ८०,०००/-रू किमतीचा ४० ग्रॅम एमडी जप्त केलेबाबत...

परिमंडळ ६ अधिनस्त ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत गस्ती दरम्यान गुन्हे प्रकटीकरण पथकास दोन इसम हे एमडी हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत येणास असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सापळा रचून आज दिनांक ०६/१०/२०२५ रोजी दोन संशयित इसमांस ताब्यात घेतले. सदर इसमांकडे विक्रीकरीता आणलेला रू. ८०,०००/- **किमतीचा ४० ग्रॅम एमडी** हा अंमली पदार्थ मिळून आला.

सदर इसमांविरोधात कलम ८ (क), २१, २९ अंमली पदार्थ विरोधी अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ताब्यात घेण्यात आलेले इसम नामे **१. मोहम्मद फैज अली खान, वय २४ वर्षे, राठी.- सी/सी/१६, चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई ८८ व २. जाहिद जहांगीर अली शेख, वय ३५ वर्षे, सी/ई/५, चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई ८८** यांस अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत हे सराईत आरोपीत असून त्याचेविरोधात यापुर्वी शरिराविरूध्दचे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउनि शदर नाणेकर करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई श्री महेश पाटील सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ६, मुंबई श्री. समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, मुंबई श्री राजेश बाबशेट्टी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे श्रीमती ऋता नेमलेकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुशील लोंढे, पोउनि शरद नाणेकर, सपोउनि धुमाळ, पोह आव्हाड, पोह पाटील, पोशि पवार, पोशि आटपाडकर यांनी केली आहे. ट्रॉम्बे पोलीसांनी ही सलग दुसरी कारवाई करीत अंमली पदार्थ विरोधी कारवायांमध्ये मोलाची कामगिरी केली आहे.

------------------------------